|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा.क्र. कबाचौउमवि/14/ककस्प-64/ 262 /2018 दि.13/8/2018

प्रति,

**मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था व,**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना -**

**विषय:-** विद्यापीठस्तरीय कथा-कथन स्पर्धेत सहभागाबाबत.....
**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/14/विवि-46/232/2018, दि.25/07/2018

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी सातत्याने विविध स्पर्धा, नाट्य सादरीकरण, अभिवाचन कौशल्य व संवाद नैपुण्य आदी कलागुणांचा विकास व्हावा याकरीता विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने **विद्यापीठस्तरीय कथा-कथन स्पर्धेचे** आयोजन करण्यात येऊन मातृभाषा व राष्ट्रभाषा यांची जनजागृती करण्यात येते. सदर स्पर्धा आयोजनाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे -

* **बुधवार, दि.29 ऑगस्ट, 2018** रोजी **सकाळी 10.00 वाजता**
* **स्थळ :- धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, डॉ. राम मनोहर लोहिया मार्ग, शिवतीर्था जवळ, एस.आर.पी. पेट्रोल पंपाशेजारी, धुळे**
* **नियम व अटी :-**

1. स्पर्धेत मराठी व हिंदी कथांचे सादरीकरण करता येईल.
2. कथाकथन स्पर्धेकरीता भाषानिहाय किमान 06 (सहा) स्पर्धक प्रवेशिका प्राप्त झाल्यावरच स्पर्धा घेण्यात येईल.
3. पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांचे विद्यार्थी/विद्यार्थीनी सदर स्पर्धेत सहभागी होऊ शकतील.
4. स्पर्धकांचा प्रवेश अर्ज संबधित प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांच्या मार्फत सादर करावा.
5. स्पर्धकाने आपल्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / विद्यापीठ प्रशाळा-विभाग यांचे मार्फत देण्यात आलेले ओळखपत्र जवळ ठेवणे आवश्यक असून संयोजकांनी मागणी केल्यावर स्पर्धेच्या वेळी सादर करावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धक म्हणून पाठवू नये.
6. स्पर्धेकरीता प्रत्येक महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / विद्यापीठ प्रशाळा-विभाग यांनी केवळ भाषानिहाय एक स्पर्धक सहभागाकरीता पाठवावा. सदर स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क नाही.
7. स्पर्धक महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / विद्यापीठ प्रशाळा-विभाग येथील नियमीत विद्यार्थी/विद्यार्थीनी असून स्पर्धेच्या वेळी त्यांचे वय 25 वर्षापेक्षा जास्त नसावे.
8. कथा स्वरचित किंवा अन्य लेखकाची असेल. कथेची हस्तलिखीत किंवा मुद्रीत प्रत स्पर्धा सुरु होण्यापूर्वी संयोजकांना सादर करावी.
9. स्पर्धेकरीता स्पर्धकाला एकूण 12 मिनीटे (10 + 2) वेळ दिला जाईल, त्या वेळेतच कथा कथन संपविणे आवश्यक आहे.
10. कथेत विभत्सपणा, अश्लिलता असू नये याची दक्षता स्पर्धकांनी घ्यावी.
11. स्पर्धेचे लॉटस् स्पर्धा सुरु होण्यापूर्वी जाहिर करण्यात येतील.
12. स्पर्धा संपल्यानंतर लगेचच स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पाडण्यात येईल.
13. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
14. स्पर्धकाच्या माहितीमध्ये अपूर्णता किंवा माहिती लपविण्याचा प्रयत्न झाल्यास अशा विद्यार्थ्यांचे पारितोषिक, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र कोणत्याही क्षणी काढून घेण्यात येईल व शिफारस करणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / विद्यापीठ प्रशाळा-विभाग यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

☎: (९१) ०२५७-२२५७४१८, ४१९ वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७-२२५७४०३, ४०६ ई-मेल : sw@nmu.ac.in, nss@nmu.ac.in

15. स्पर्धेचे नियम, पारितोषिक किंवा नियम बदलविण्याचा अधिकार संचालक, विद्यार्थी विकास, उमवि, जळगाव यांचा राहील.

* **पारितोषिक :-**
  1. प्रथम क्रमांक - रु.1001/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र (भाषानिहाय)
  2. द्वितीय क्रमांक - रु.701/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र (भाषानिहाय)
  3. तृतीय क्रमांक - रु.501/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र (भाषानिहाय)

  स्पर्धेत प्रत्यक्ष सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

* **स्पर्धक नोंदणी :-**

  सदर स्पर्धेसाठी सोबतची प्रवेशिका **सोमवार, दि.27 ऑगस्ट, 2018** पर्यंत **धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे** येथे पाठवावी. तदनंतर प्राप्त प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

* **अधिक माहितीसाठी संपर्क पत्ता व दूरध्वनी क्र.:-**
  1. मा. डॉ. अरविंद जोशी, प्राचार्य, धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे 9422961972, ई-मेल desdhule@yahoo.com
  2. डॉ. आरती पी. सपकाळे, विद्यार्थी विकास अधिकारी - 9623299754

  स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांनी स्पर्धा सुरु होण्यापूर्वी म्हणजे **सकाळी 09.00 वा.** कार्यक्रमास्थळी उपस्थित राहावे. सदर स्पर्धा उपक्रमास आपण सहकार्य करावे, ही विनंती.

  उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुन:श्च कळविण्यात येते की, **विद्यापीठस्तरीय कथा-कथन स्पर्धेत** निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि.27/08/2018** पर्यंत **धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे** यांना ईमेल desdhule@yahoo.com पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठ **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर भेट दिल्यास उपलब्ध आहे.

  कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. सो. तु. इंगळे)
**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

* **सोबत :-** विद्यार्थी स्वयंवृत्त
* **प्रत माहितीसाठी :-**

1) मा. प्राचार्य, धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे
2) धुळे जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी
3) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
4) प्र.उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
5) उपकुलसचिव, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
6) मा. विभाग प्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद पत्रकारिता विभाग, कबचौउमवि, जळगाव
7) मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
8) मा.पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

D:\Katha Kathan Spardha 2018-19/2018

☎ : (९१) ०२५७-२२५७४१८, ४१९ वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७-२२५७४०३, ४०६ ई-मेल : sw@nmu.ac.in, nss@nmu.ac.in

# प्रवेशिका

दि.    /    /2018

प्रति,
**मा. प्राचार्य,**
धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
धुळे

**विषय:-** **विद्यापीठस्तरीय कथा-कथन स्पर्धेत सहभागाबाबत.....**
**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/14/विवि-64/262/2018, दि.13/8/2018

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रकान्वये **विद्यापीठस्तरीय कथा-कथन स्पर्धा** आपल्याकडे संयोजित होत आहे. या स्पर्धेकरीता आमच्याकडील खालील नमूद स्पर्धक सहभागी होत आहेत.

| अ. क्र. | स्पर्धकाचे संपूर्ण नांव | स्पर्धकांचा पूर्ण निवासी पत्ता | वर्ग | ओळख पत्र क्र. | जन्मतारीख व वय | स्पर्धा सहभाग मराठी / हिंदी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

आपणांस विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, स्पर्धेत सहभागी होणारे विद्यार्थी आमच्याकडे शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील नियमीत विद्यार्थी म्हणून प्रवेशित असून त्यांना स्पर्धेत सहभागी करुन घ्यावे. स्पर्धेचे नियम व अटी आमच्या स्पर्धक संघास मान्य आहेत.

**टिप:-** स्पर्धकांना निवास व्यवस्थेची आवश्यकता आहे / नाही.

ठिकाण:-
दिनांक:-    /    /2018

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/संचालक**
सही व शिक्का

D:\Katha Kathan Spardha 2018-19/2018